# जन वाचन आंदोलन




जनवाचन आंदोलन हे पुस्तकांना गावागावात घेऊन जाणारे आंदोलन आहे. नवसाक्षर व अर्धशिक्षित लोकांमध्ये पुस्तकांचे सामुदायिक वाचन करणे, ते ऐकणे आणि ऐकवणे हा याचा उद्देश आहे. आज गावातल्या लोकांपर्यंत पुस्तके पोचत नाहीत. त्यांची भाषा त्यांना उमगत नाही आणि किमती परवडत नाहीत. अशा नव-वाचकांपर्यंत पुस्तके पोचवण्याचे काम भारत ज्ञान विज्ञान समितीने अंगिकारले आहे. ही पुस्तके प्रसिद्ध लेखकांची आणि सोपी, सुटसुटीत व स्वस्त किमतीत असावीत असा प्रयत्न आहे.

या आंदोलनातून काय साध्य होईल?

गावागावात जनवाचनाची व जनवाचनालयांची संस्कृती निर्माण होईल. साक्षरता आंदोलनातून हस्तगत केलेली अक्षरकौशल्ये लोक स्वतः विकसित करू शकतील. त्यांच्या ज्ञानविज्ञानाच्या कक्षा विस्तारतील. त्यांच्या सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक जाणिवांची पातळी उंचावू शकेल. आपल्या मूलभूत हक्कांच्या आणि एकंदर परिवर्तनाच्या लढ्यासाठी जागृत होऊन ते उभे ठाकू शकतील.

देशातील लोकशाही टिकण्यासाठी आणि अर्थपूर्ण होण्यासाठी हे आवश्यक आहे. साक्षरता म्हणजे केवळ अक्षर ओळख नव्हे तर संपूर्ण जग जाणण्याचे ते कार्य आहे. या दिशेने, गावागावातील लोकांच्या खांद्याला खांदा भिडवून, आम्ही पुढे जाऊ इच्छितो.




भारत ज्ञान विज्ञान समिती

किंमत रु. २-५०

# आजीचा न्याय

लेखक : रिझवान जहीर उस्मान

रुपांतर : विनय र.र.



भारत ज्ञान विज्ञान समिती

पुस्तकाचे नाव :आजीचा न्याय

लेखक : रिझवान जहीर उस्मान
रुपांतर : विनय र.र.

निर्मिती सहाय्य : गणेश कांबळे

चित्रकार : यश कळवणकर
युथ आर्टिस्ट ऑर्गनायझेशन

जवाआं/२४

प्रकाशन : फेब्रुवारी १९९७

नववाचकांसाठी भारत ज्ञान विज्ञान समिती तर्फे राष्ट्रीय साक्षरता मिशनच्या सहकार्याने देशभर चालवल्या जात असलेल्या 'जनवाचन आंदोलन' मोहिमेसाठी प्रकाशित

मूल्य : २ रुपये ५० पैसे

© सर्वाधिकार भारत ज्ञान विज्ञान समिती (महाराष्ट्र)

प्रकाशक : दत्ता देसाई
राज्य समन्वयक, भारत ज्ञान विज्ञान समिती (महाराष्ट्र)
अक्षय, २१६, केळकर रस्ता, नारायण पेठ, पुणे ४११०३०
फोन : ४५६६९४
मुद्रण स्थळ : महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे ४११००४

अक्षर जुळणी व मांडणी : दिनानाथ मनोहर

# आजीचा न्याय

दोन प्रवासी वाळवंटातून चालले होते. प्रवास अतिशय खडतर होता. प्रवास वाळवंटातला होता. वाळू दिवसा खूप तापायची. गरम हवेचे झोत वहायचे. सर्वांगाला चटके बसायचे. सूर्य मावळला की वाळू गार व्हायला लागायची. हवा गार व्हायची. रात्री गारठ्याने काकडायला व्हायचे. तशातच रात्री आकाशातल्या चांदण्या पाहून दिशेचा अंदाज घ्यायचा आणि चालत राह्यचं. असा प्रवास सुरू होता. आता त्यांच्याकडं फक्त दोन दिवस पुरेल एवढंच पाणी उरलं होतं. आणि शिदोरीही मोजकीच होती. एकाकडं पाच भाकऱ्या होत्या



तर दुसऱ्याकडं फक्त तीन. शहर मात्र अजून बरेच लांब होते.

दोघे प्रवासी सज्जन होते. जेव्हा केव्हा, जे काही शिकायला मिळेल ते शिकून घ्यायचे. नवं दिसेल ते पहायचे. मनात साठवायचे, चर्चा करायचे. एकदा अंधार पडला तेव्हा ते फार थकले होते. थोडा आराम करण्यासाठी एका खजुराच्या झाडाखाली ते बसले.

एक म्हणाला, ''झोपताना माणसानं आजचा आणि उद्याचा विचार केला पाहिजे. विचार केला तर काम सोपं कसं होईल ते सुचतं.''

दुसरा म्हणाला, ''व्वा! काय लाख बोललात! अंगमेहनत केली आणि डोकं वापरलं, तर दोन्ही मिळून माणसाला स्वत:चं जीवन घडवता येतं. चांगलं काही करता येतं.''

''हो ना, मेहनत घेतली तर विस्कटलेली आयुष्याची घडीसुद्धा नीट घालता येते,'' पहिला म्हणाला.

थोड्या वेळानं दोघांनाही तरतरी वाटली, तेव्हा ते पुढे जायला निघाले. चालता चालता पहिला म्हणाला, ''मनात चांगली भावना असेल तर माणूस खऱ्याच्या वाटेनं जातो. दुसऱ्याला त्रास देत नाही. गरीबांना मदत करतो. अनाथ, अपंगांना, निरक्षरांना आणि महिलांना नाडणाऱ्यांशी दोन हात करतो.''



दुसरा म्हणाला, ''पुस्तकं वाचली की आपल्या डोक्यात प्रकाश पडतो,पण दुसऱ्याला नाडण्यासाठी जो शिकतो, तो शिकूनही अडाणीच रहातो. शिक्षणाचा उपयोग करून जगाला गुलाम बनवणं वाईट.''

अशाप्रकारे शहाणपणाबद्दल ते बोलत बोलत चालले होते. शहर अजून खूपच दूर होते.

पहिला म्हणाला, ''मला शिकता आलं नाही. शिकलो असतो तर अशी वणवण झाली नसती. खरंच जर मला शिकायला मिळालं असतं तर?''

दुसरा म्हणाला, ''नुसता पश्चाताप करून काय उपयोग? अजून देखील शिकता येईल की. शहरात पोचलास की, चांगलं लिहायला वाचायला शिकून घे. नाहीतर प्रौढ साक्षर वर्गातून शीक. शिकण्याचं वय कधी सरत नाही. लक्षात ठेव, माणसाला कधीही शिकता येतं. मी पण अडाणीच आहे.''

पहिला म्हणाला, ''खरं म्हणाल तर लहानपणापासून शिकायची आणि काहीतरी कसब कमवायची इच्छा आहे. पण तशी संधीच मिळाली नाही.''

''संधीच मिळाली नाही? कशामुळं?'' दुसऱ्यानं विचारलं.

'' काही कळण्यापूर्वीच मोठं व्हावं लागलं. भटकंतीशिवाय हाती काहीच नाही लागलं. आईबाप नव्हते, अनाथ माणूस कुठून शिक्षण घेणार?'' पहिला उत्तरला.

''धीरानं घे. अजून संधी आहे. शहर फार दूर नाही. कुठंतरी काम बघ, आणि मग शिक्षण सुरू कर. शिकलं म्हणजे आयुष्यात पुढं जायची संधी मिळते. मी पण शिकायला



सुरूवात करणार आहे.'' समजूत काढीत दुसरा म्हणाला.

अशा प्रकारे सुखदु:खाच्या गोष्टी करत ते चालले होते. मध्यरात्र झाली. तहानेनं घसा सुकला होता, भूकेनं



जीव व्याकूळ झाला होता. दोघांनी घोटघोट पाणी घेतलं. त्यांनी भाकरी खाल्ली नाही. भाकरी अजून बऱ्याच पुरवायच्या होत्या. शहरात कामधंदा मिळेपर्यंत दोन दिवस भाकऱ्यांचाच आधार होता. दोघेही थकले होते, पण ते दोघे चालत राहिले. ताबंडं फुटलं तसं दोघं सावलीचं झाड पाहून लवंडले. दोघांनाही गाढ झोप लागली.

ते झोपलेले असताना, कुठूनतरी भटकत आलेला प्रवासी त्यांच्याजवळ येऊन बसला. त्यानं चार दिवसात काहीही खाल्लं नव्हतं. तो तहानेनं, भुकेनं व्याकूळ झाला होता. तो चोर नव्हता. त्याला भाकरी हवी होती पण कष्टाची. चोरीची नाही. तो कष्ट करून जगणारा होता. ऐतखाऊ नव्हता. तो त्या दोघा झोपलेल्या प्रवाशांजवळ बसून राहिला.

झोप सरल्यावर दोघे उठले आणि तिसऱ्याला पाहून दचकले. आपण झोपेत असताना, ह्यानं आपल्या भाकरी खाल्ल्या तर नाही ना? त्यांना शंका आली. त्यांनी सामान चाचपून बघितलं. पहिल्याच्या पाच भाकरी शाबूत होत्या आणि दुसऱ्याच्याही तीन भाकरी जिथल्या तिथं होत्या.

तिसऱ्याने सांगितले की तो कोणी चोर किंवा डाकू नाही. तोही एक सज्जन माणूस आहे. वाट चुकून भटकत राहिल्यामुळे त्याच्याजवळचे खाण्यापिण्याचे सर्व पदार्थ संपून

गेले आहेत. तो चार दिवसांचा भुकेला व तहानलेला आहे. त्याच्याजवळ एक एक रूपयाची आठ नाणी आहेत. पण शहर तर अजून दूर आहे. काही खायला मिळालं नाही तर तो आता मरूनच जाईल, अशी अवस्था होती.

तीन भाकरीवाला म्हणाला की त्याच्याकडे तीन भाकरी आहेत, पण त्या आत्ताच खायच्या नाहीत. शहरात गेल्यावर आधारासाठी ठेवलेल्या आहेत.

पाच भाकरीवाला पण तसेच म्हणाला. परक्या शहरात काहीच मिळालं नाही तरी दोनतीन दिवस काढायला लागतील. पण तिघांनी मिळून जर काही करायचं ठरवलं तर तसं करायला तो तयार होता.

तिसरा म्हणाला, ''अन्न हे पूर्णब्रह्म आहे. आपण सुशिक्षित दिसता. ज्ञानाचा प्रकाश मनातला अंधार दूर करतो. तुम्हा दोघांकडे आठ भाकरी आहेत, माझ्याकडे आठ नाणी आहेत. बोला, काय करायचं?''

तीन भाकरीवाला म्हणाला, ''मी अडाणी आहे. भुकेला तर आहेच. तुम्ही मला सुशिक्षित समजला, आनंद वाटला. मी एवढं शिकलोय की, माणूस कष्टानं झाडं लावतो आणि त्याची फळं पुढच्या पिढयांना मिळतात. माझ्याकडं तीन



भाकरी आहेत, कधीतरी त्या संपणारच. शिकणं संपत नसतं. तुमची भूक भागेल आणि आमचं नुकसान होणार नाही असं काही करता येईल का?''

तिसरा म्हणाला, ''माझ्याकडे आठ नाणी आहेत. पण नाणी खाऊन भूक भागविता येत नाही. तुम्ही तुमच्या आठही भाकरी मला विका. मी माझ्याकडील आठही नाणी तुम्हाला देईन.''

दुसरा म्हणाला, '' तुम्हाला भाकरी विकल्या तर आमचं पोट काही नाणी खाऊन भरणार नाही. आम्हालाही लांब जायचंय. दुसरं काहीतरी बोला.''

तिसरा म्हणाला, ''कोणाची तरी भाकरी चुकीच्या मार्गानं मिळवणं हे दुष्टाचं काम आहे. मला इमानदारीनं भाकरी हवी. मला नाण्यांची गरज नाही. भाकरीची आहे. मी नशिबावर विश्वास ठेवतो. पण काही मिळालं नाही तर खंत करीत नाही. मी तुम्हाला भाकरी विका म्हणालो, पण विकणे, न विकणे तुमच्या मर्जीवर आहे. तुम्हाला काही भाकरी ठेवून उरलेल्या मला विका.''

पहिला इतका वेळ काही बोलला नव्हता. त्याचं म्हणणं पडलं की भाकरी विकायच्या पण आठही भाकरी आपण

सर्वांनी मिळून खायच्या.

दुसरा म्हणाला, ''पण असं केलं तर मग सर्वच भाकऱ्या संपून जातील.''

तिसरा म्हणाला, ''जगलो तर आणखी भाकरी कमावू.''

पहिला म्हणाला, ''दुसरी काही युक्ती सुचत असेल तर बोला. विचार करू.''

तिसरा म्हणाला, ''मला हा मार्ग योग्य वाटतो. मी आठही नाणी तुम्हाला देतो. आपण सर्व भाकऱ्या वाटून खाऊया.''

याप्रमाणे विचार करून तिघांचा निर्णय झाला.

तिसऱ्याने आठही नाणी त्या दोघांसमोर ठेवली. पाच भाकरीवाल्याने पाच भाकरी काढल्या, तीन भाकरीवाल्याने तीन भाकरी काढल्या. प्रत्येक भाकरीचे त्यांनी तीन तीन तुकडे केले. एकूण तुकडे झाले चोवीस. प्रत्येकानं आठ आठ तुकडे खाल्ले. पाणी पिऊन ढेकर दिली. आता प्रत्येकाचे पोट भरले होते. तरतरी वाटत होती. दोघांचे मनापासून आभार मानून तो तिसरा निघून गेला. त्याला वेगळ्या



दिशेने जायचे होते. तो गेला तसे हे दोघेही निघाले. आता पावले झपाझपा पडत होती. शहर जवळ आल्यासारखं वाटायला लागलं, तसं तीन भाकरीवाला म्हणाला, ''आता आठ नाण्यांची वाटणी करू या.''

पाच भाकरीवाला म्हणाला, ''चालेल.''

त्याने तीन भाकरीवाल्याला तीन नाणी दिली. तीन भाकरीवाला संतापला, म्हणाला, ''तीन नाणी कशी? आठ रूपयांना भाकरी विकल्या. सर्वांनी वाटून खाल्ल्या. आता रूपयांची वाटणी तशीच होऊ दे. चार नाणी मला दे. चार नाणी तू घे.''

पाच भाकरीवाला म्हणाला, ''माझ्या पाच भाकरी होत्या म्हणून मला पाच नाणी आणि तुझ्या तीन भाकरी होत्या म्हणून तुला तीन नाणी.'' तीन भाकरीवाल्याला हे मान्य नव्हतं. त्याला अर्धा हिस्सा हवा होता. पण पाच भाकरीवाला अर्धे अर्धे वाटे करणार नाही म्हणून अडून राहिला.

दोघे शहराजवळ आले तरी भांडतच होते. शहराच्या वेशीपाशी एका म्हाताऱ्या आजीचं घर होते. ती चतुर होती. गावातले झगडे तिच्याकडे आले की ती योग्य निवाडा करत असे. आजीनं दोघांना भांडताना पाहिलं. तिनं त्यांना विचारलं,

''का भांडता उगाच?''

तीन भाकरीवाल्याने काय घडले ते सविस्तर सांगितले.

आजी म्हणाली, ''पाच भाकरीवाला देतोय तितकी



नाणी तू घे. त्यात तुझाच फायदा आहे.''

तीन भाकरीवाला म्हणाला, ''हा कसला न्याय? निम्मे



निम्मे वाटे झाले पाहिजेत. नाहीतर माझंच नुकसान आहे. योग्य वाटप झालं पाहिजे. तुम्ही नीट न्याय करा.''

आजीनं विचारलं, ''योग्य वाटप झालं तर तू ते मान्य करशील?''

दुसरा म्हणाला, ''हो. योग्य वाटप जरूर मानेन.''



आजी म्हणाली, ''ठीक आहे. मग तुला एक नाणं आणि पाच भाकरीवाल्याला सात नाणी असं वाटप खरं योग्य वाटप आहे.''

तीन भाकरीवाला चक्रावला, म्हणाला, ''असं कसं?''

आजी म्हणाली, ''बाबा रे, भाकरी होत्या आठ. खाणारे तीन. तुम्ही आठ भाकऱ्यांचे चोवीस तुकडे केले. प्रत्येकाने आठ तुकडे खाल्ले. तुझ्याकडे तीन भाकरी होत्या. त्याचे किती तुकडे झाले? नऊ. त्यापैकी तू खाल्लेस आठ. किती उरले? फक्त एक. बरोबर? आता पाच भाकऱ्यांचे किती तुकडे झाले? पंधरा. त्याने त्यातील आठ खाल्ले. त्यातून किती उरले? सात.

तुझ्याकडील नऊ तुकड्यांपैकी तू आठ खाल्लेस व उरलेला एक तिसऱ्याला दिलास. ह्याने ह्याच्याजवळील पंधरा तुकड्यांपैकी आठ खाल्ले, उरलेले सात तुकडे तिसऱ्याला दिले. ह्या हिशोबानं तुझ्या वाट्याला एकच नाणं येतं व ह्याच्या वाट्याला सात. स्वत: खाल्लेलं तू विसरलास. पाच भाकरीवाला तुला चांगली तीन नाणी देत होता. आता योग्य हिशोबानं तुला एकच नाणं घे. ''

आजीचा न्याय ऐकून दोघंही चक्रावून गेले.

तीन भाकरीवाला चरफडला, त्याला तिनाच्या ऐवजी एकच नाणं मिळणार होतं. पाच भाकरीवाल्याला वाटलं की आपण अडाणीपणामुळं चुकीचा हिशोब करून आपलं नुकसान



करून घेत होतो.

आजी म्हणाली, ''आता भांडण्यापेक्षा लिहायला, वाचायला शिका. हिशोब ठेवायला शिका.''

ही गोष्ट दोघांना पटली आणि तसं करायचं ठरवून दोघं आपापल्या वाटेला लागले.

✦✦✦✦✦